महावितरण

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित


दुरध्वनी क्र. ०२२ : २६४७४२११
: २६४७५१२८
भ्रमणध्वनी क्र. : ९९३००२००२४
Email : edhr_dist@mahadiscom.in

कार्यकारी संचालक (मासं) यांचे कार्यालय
'प्रकाशगड', ६वा मजला, अनंत काणेकर मार्ग,
प्लॉट नं.जी -९, बांद्रा (पूर्व),
मुंबई -४०००५१


## प्रशासकीय परिपत्रक क्र. २६० दिनांक ७/११/२००९

विषय : महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिक कामासाठी राजकीय पक्षाकडून किंवा ति-हाईत व्यक्तीकडून दबाव आणणेबाबत.

----

महावितरण कंपनीतील काही कर्मचारी त्यांची नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर वैयक्तिक कामाकरिता कंपनी बाहेरील अधिकारी, पदाधिकारी किंवा इतर प्रभावी/वजनदार वरिष्ठ अधिकारी/नेते यांचेकडून शिफारसींचा प्रयत्न करतात असे निदर्शनास आले आहे.

२. वैयक्तिक कामासाठी कर्मचा-यांनी केलेली सदर कृती ही संदर्भिय परिपत्रकान्वये वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन न करणे व म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवा विनियमातील तरतुदींचा भंग करणारी आहे. या अनुषंगाने संबंधित कर्मचा-याविरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याबाबत व त्यांच्या सेवापुस्तिकेत आणि गोपनीय अहवालात तशा नोंदी करण्याच्या सूचना परिपत्रकान्वये यापूर्वी वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

३. सबब, महावितरण कंपनीतील सर्व कर्मचा-यांना पुन्हा एकदा सूचीत करण्यात येते की, त्यांनी सेवा विनियमा मधिल खालील तरतूद ध्यानात ठेवावी.

> सेवा नियम ८५ (ढ) मंडळाचा कोणातही कर्मचारी मंडळाचा एक कर्मचारी म्हणून व्यक्तिशः त्याच्याशी संबंधित किंवा सर्वसाधारणतः मंडळाच्या कर्मचा-यांच्या कोणत्याही वर्गाशी संबंधित किंवा मंडळाच्या कोणत्याही कामकाजाशी संबंधित अशा कोणत्याही प्रश्नाबाबत शासनाकडे किंवा शासनाच्या कोणत्याही अधिका-याकडे किंवा कोणत्याही विधानमंडळ सदस्याकडे तक्रार घेऊन जाणार नाही.

४. वैयक्तिक कामासाठी उदाहरणार्थ पदोन्नती, बदली इत्यादी कामांकरिता वरिष्ठ अधिका-यांवर कोणत्याही प्रकारे शिफारस आणण्याचा प्रयत्न करणा-या कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल शिवाय त्यांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात तशी नोंद केली जाईल. हया नोंदीची बढती व बदलीच्या वेळी उचित दखल घेण्यात येईल.

५. सर्व सक्षम अधिका-यांना विनंती करण्यात येते की या विषयी दिलेल्या सूचना त्यांच्या अखत्यारितील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत खबरदारी घ्यावी. तसेच असे प्रकरण निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचा-याविरुध्द वरील दिलेल्या सूचनेप्रमाणे तथा सेवाविनियमातील तरतुदी अन्वये शिस्तभंग कार्यवाही करावी. शिवाय याबाबत त्यांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात तशी नोंद घ्यावी. व तसा अहवाल मुख्यालयातील शिस्तभंग कक्षाकडे पाठवावा.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या **WWW.mahadiscom.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

राहुल गोवर्धन

**(कर्नल राहुल गोवर्धन)**
**कार्यकारी संचालक (मासं.)**

प्रत,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे उपविभागीय कार्यालयाचे स्तरापर्यंत.